दिनांक 28/02/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.148 ची नक्कल

संदर्भ- दिनांक 23/02/2023 ने लेखापाल व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगरपरिषदेकडील सन 2022-2023 चा सुधारीत अर्थसंकल्प व सन 2023-2024 च अनुमानित अर्थसंकल्प खालील प्रमाणे.

## सन 2022-2023 चा सुधारीत अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | - 572122789/- |
| सन 2022- 2023 ची जमा | - 776818000/- |
| शिलकेसह एकूण जमा | - 1348940789/- |
| सन 2022-2023 चा खर्च | - 1006372630/- |
| अखेर शिल्लक | - 342568159/- |

## सन 2023-2024 चा अनुमानित अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | - 342568159/- |
| सन 2023- 2024 ची जमा | - 961815500/- |
| शिलकेसह एकूण जमा | - 1304383659/- |
| सन 2023-2024 चा खर्च | - 1303988659/- |
| अखेर शिल्लक | - 395000/- |

वरील अर्थसंकल्पामध्ये कोणतीही करवाढ/दरवाढ करणेत आलेली नाही. सदरच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101 अन्वये मंजूरी देत आहे. सदरचा अर्थसंकल्प अंतिम मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारीसो,सांगली यांचेकडे सादर करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

खरी नक्कल
( स्वप्निल पांडुरंग खामकर )
उपमुख्याधिकारी
विटा नगरपरिषद विटा

# विटा नगरपरिषद,विटा (जिल्हा-सांगली )

## सन 2022- 2023 चे सुधारीत व सन 2023 - 2024 चा अनुमाणित अर्थसंकल्प

### सन 2022- 2023 चा सुधारीत अर्थसंकल्प

| | | |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | - | 572122789 |
| सन 2022- 2023 ची जमा | - | 776818000 |
| शिल्लकेसह एकूण जमा | - | 1348940789 |
| सन 2022- 2023 चा खर्च | - | 1006372630 |
| अखेर शिल्लक | - | 342568159 |

### सन 2023- 2024 चा अनुमाणित अर्थसंकल्प

| | | |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | - | 342568159 |
| सन 2023- 2024 ची जमा | - | 961815500 |
| शिल्लकेसह एकूण जमा | - | 1304383659 |
| सन 2023- 2024 चा खर्च | - | 1303988659 |
| अखेर शिल्लक | - | 395000 |

श्री. ज्ञानेश्वर खंडागळे
लेखापाल
विटा नगरपरिषद विटा

श्री. संतोष दराडे
अंतर्गत लेखापरिक्षक
विटा नगरपरिषद विटा

श्री. मनोजकुमार देसाई
मुख्याधिकारी
विटा नगरपरिषद विटा

श्री संतोष भोर
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

# विटा नगरपरिषद विटा

**नमुना क्रमांक 86**

**(नियम क्रमांक 406 पहा)**

## सन 2022- 2023 चा सुधारित व सन 2023- 2024 चा अनुमाणित अर्थसंकल्पाचा सारांश

| अ.क्र. | तपशील | लेखा संकेतांक | सन 2019-2020 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2020-2021 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2021-2022 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2022-2023 वर्षाकरिता | | एकूण | सन 2023-2024 सालाचे जमा/खर्चाचे अर्थसंकल्पीय | वाढ/घट झाल्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 8 महिन्यातील प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | 4 महिन्यातील अंदाजे जमा/खर्च रक्कम | | | |
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | **भाग एक** | | | | | | | | | |
| 1 | **महसुली जमा** | | | | | | | | | |
| 1 | कर महसूल (क) ची बेरीज | | 63589492 | 73077572 | 80207309 | 16560637 | 95310363 | 111871000 | 124516000 | |
| 2 | अभिहस्तांकित महसूल आणि भरपाई (ख) ची बेरीज | | 4573334 | 3755376 | 0 | 0 | 6015000 | 6015000 | 7015000 | |
| 3 | महसुली अनुदाने, अंशदाने व अर्थसहाय्य (ग) ची बेरीज | | 79527027 | 75639503 | 95664057 | 135696743 | 45268257 | 180965000 | 186165000 | |
| 4 | नगरपरिषद मालमत्तापासून मिळणारे भाड्याचे उत्पन्न (घ) ची बेरीज | | 8385960 | 6213688 | 7873070 | 631169 | 8158831 | 8790000 | 19650000 | |
| 5 | फी, वापरकर्ता व भाडे आकार (ड) ची बेरीज | | 9437914 | 15180154 | 14039471 | 8111182 | 15157818 | 23269000 | 30541500 | |
| 6 | विक्री व भाडे आकार (च) ची बेरीज | | 122100 | 123400 | 145900 | 38152 | 422848 | 461000 | 521000 | |
| 7 | व्याजापासून मिळणारे उत्पन्न (छ) ची बेरीज | | 12389476 | 27217781 | 10131417 | 8898559 | 21111441 | 30010000 | 35010000 | |
| 8 | समपहृत ठेवी/ना परतावा ठेवी (ज) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 9 | इतर उत्पन्न (झ) ची बेरीज | | 37664 | 2000 | 0 | 512994 | 213006 | 726000 | 781000 | |
| | **एकूण महसुली जमा** | | **178062967** | **201209474** | **208061224** | **170449436** | **191657564** | **362107000** | **404199500** | |

| अ.क्र. | तपशील | लेखा संकेतांक | सन 2019-2020 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2020-2021 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2021-2022 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2022-2023 वर्षाकरिता 8 महिन्यातील प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2022-2023 वर्षाकरिता 4 महिन्यातील अंदाजे जमा/खर्च रक्कम | एकूण | सन 2023-2024 सालाचे जमा/खर्चाचे अर्थसंकल्पीय | वाढ/घट झाल्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | **भाग दोन** | | | | | | | | | |
| 2 | **महसुली खर्च** | | | | | | | | | |
| 1 | आस्थापना खर्च एकूण (क) ची बेरीज | | 79295705 | 92679203 | 99600265 | 101109704 | 48020926 | 149130630 | 148649500 | |
| 2 | प्रशासकीय खर्च एकूण (ख) ची बेरीज | | 14811361 | 18153540 | 16489869 | 19883658 | 24411342 | 44295000 | 58216000 | |
| 3 | व्याज आणि वित्त आकार एकूण (ग) ची बेरीज | | 177 | 0 | 1422.15 | 1238 | 1003762 | 1505000 | 1505000 | |
| 4 | मत्तांची दुरुस्ती व परिरक्षण एकूण (घ) ची बेरीज | | 38862148 | 18916648 | 35663737 | 17942232 | 33957768 | 51900000 | 90000000 | |
| 5 | व्यवहार व कार्यक्रम अंमलबजावणी यांकरिता खरेदी एकूण (ङ) ची बेरीज | | 38748499 | 36466340 | 43051353 | 42952629 | 32207371 | 75160000 | 157810000 | |
| 6 | दिलेली महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य एकूण (च) ची बेरीज | | 4354601 | 8417021 | 4787960 | 6835950 | 4939050 | 11775000 | 18656159 | |
| 7 | तरतुदी आणि निर्लेखित करणे एकूण (छ)ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 300000 | 300000 | 1000000 | |
| 8 | राखीव निधी आणि संकीर्ण खर्च (ज) ची बेरीज | | 8449 | 1943805 | 3631834 | 753288 | 1796712 | 2550000 | 4600000 | |
| | **एकूण महसुली खर्च** | | **176080940** | **176576557** | **203226440.2** | **189478699** | **146636931** | **336615630** | **480436659** | |

| अ.क्र. | तपशील | लेखा संकेतांक | सन 2019-2020 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2020-2021 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2021-2022 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2022-2023 वर्षाकरिता 8 महिन्यातील प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | 4 महिन्यातील अंदाजे जमा/खर्च रक्कम | एकूण | सन 2023-2024 सालाचे जमा/खर्चाचे अर्थसंकल्पीय | वाढ/घट झाल्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | **भाग तीन** | | | | | | | | | |
| 3 | **भांडवली जमा** | | | | | | | | | |
| 1 | विशिष्ट प्रयोजनाकरिता अनुदाने, अशंदाने (क) | | 319347494 | 186214618 | 286841551 | 69207000 | 257533000 | 326740000 | 448540000 | |
| 2 | सुरक्षित व असुरक्षित कर्जे (ख) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 22000000 | 22000000 | 32500000 | |
| 3 | प्राप्त ठेवी (ग) ची बेरीज | | 82671432 | 135106841 | 23041902 | 16207277 | 48463723 | 64671000 | 74576000 | |
| 4 | शासनाच्या वतीने वसुली (घ) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 1300000 | 1300000 | 2000000 | |
| 5 | इतर दायित्वे (ङ) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | **एकूण भांडवली जमा** | | **402018926** | **321321459** | **309883453** | **85414277** | **329296723** | **414711000** | **557616000** | |
| 4 | **भांडवली खर्च** | | | | | | | | | |
| 1 | स्थिर व जंगम मत्ता एकूण (क) ची बेरीज | | 2646000 | 0 | 650800 | 0 | 3250000 | 3250000 | 16600000 | |
| 2 | प्रगतिपथावरील भांडवली काम एकूण (ख) | | 109048338.8 | 118766030 | 167026679 | 175381156 | 89830844 | 265212000 | 334322000 | |
| 3 | गुंतवणुका एकूण (ग) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 4 | हातात असलेला साठा एकूण (घ) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 5 | किरकोळ ऋणको एकूण (ङ) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 6 | कर्जे, अग्रिमे आणि ठेवी एकूण (च) ची बेरीज | | 88824861 | 232920138 | 15540938 | 121547357 | 84012643 | 205560000 | 299500000 | |
| 7 | रोख आणि बँक शिल्लक एकूण (छ) ची बेरीज | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 8 | इतर मत्ता एकण (ज) ची बेरीज | | 114858116 | 33076938 | 45161258 | 135270493 | 60464507 | 195735000 | 173130000 | |
| | **एकूण भांडवली खर्च** | | **315377315.8** | **384763106** | **228379675** | **432199006** | **237557994** | **669757000** | **823552000** | |

| अ.क्र. | तपशील | लेखा संकेतांक | सन 2019-2020 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2020-2021 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2021-2022 सालाची प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | सन 2022-2023 वर्षाकरिता | | एकूण | सन 2023-2024 सालाचे जमा/खर्चाचे अर्थसंकल्पीय | वाढ/घट झाल्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 8 महिन्यातील प्रत्यक्ष जमा/खर्च रक्कम | 4 महिन्यातील अंदाजे जमा/खर्च रक्कम | | | |
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | |
| | आरंभी शिल्लक (महसुली + भांडवली) | | 435969320 | 524592957 | 485784227 | 572122789 | | 572122789 | 342568159 | |
| | एकूण महसुली जमा | | 178062967 | 201209474 | 208061224 | 170449436 | 191657564 | 362107000 | 404199500 | |
| | एकूण भांडवली जमा | | 402018926 | 321321459 | 309883453 | 85414277 | 329296723 | 414711000 | 557616000 | |
| | आरंभी शिल्लकेसह एकूण जमा | | 1016051213 | 1047123890 | 1003728904 | 827986502 | 520954287 | 1348940789 | 1304383659 | |
| | एकूण महसुली खर्च | | 176080940 | 176576557 | 203226440.2 | 189478699 | 146636931 | 336615630 | 480436659 | |
| | एकूण भांडवली खर्च | | 315377315.8 | 384763106 | 228379675 | 432199006 | 237557994 | 669757000 | 823552000 | |
| | एकूण खर्च (महसुली+भांडवली) | | 491458255.8 | 561339663 | 431606115.2 | 621677705 | 384194925 | 1006372630 | 1303988659 | |
| | **अखेरची शिल्लक (महसुली+भांडवली)** | | **524592957** | **485784227** | **572122789** | | | **342568159** | **395000** | |

लेखापाल
विटा नगरपरिषद विटा

अंतर्गत लेखापरिक्षक
विटा नगरपरिषद विटा

मुख्याधिकारी
विटा नगरपरिषद विटा

प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

वाचले:- (1) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101 मधील तरतुदी.

(2) मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील क्र.आयएनएस १००२/प्र.क्र.१८/२०००/कार्या-६, दि.५ मार्च, २००२ चा स्थायी निदेश क्रमांक १५.

(3) मुख्याधिकारी,विटा नगरपरिषद,यांचेकडील पत्र जा.नं.नपा. 4168 /2023 नगरपरिषद दि. 08/03/2023 (प्राप्त दिनांक- 31/03/2023)

(4) विटा नगरपरिषदेचा दि.28/02/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.148

==========================================================

क्र.नवि/अर्थसंकल्प/कार्या-4/ 130 /2023
नगरपालिका प्रशासन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
दिनांकः- 06 /06/2023

**आदेश**

मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद, विटा यांनी संदर्भ क्र.3 अन्वये सादर केलेल्या सन 2022-23 च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन 2023-24 च्या प्रस्तावित अर्थसंकल्प अवलोकनात आला. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(4) मधील तरतुदी तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 वर नमुद स्थायी निदेश क्रमांक 15 मधील निदेशानुसार मी, जिल्हाधिकारी सांगली, विटा नगरपरिषदेच्या सन 2022-23 चा सुधारित व सन 2023-24 च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पास खालील अटीस अधिन राहून मंजुरी देत आहे.

1) उक्त अधिनियमातील कलम 101 (1 अ) मधील तरतूदीनुसार नगरपरिषद पुरवित असलेल्या सेवा (अ) पाणी पुरवठा व मलनिःस्सारण (ब) गटारी साफ करणे व कचरा वाहतूक आणि विल्हेवाट (क) रस्त्यावरील दिवाबत्ती - यांचे स्थायी निदेश क्र. 9 अन्वये अर्थसंकल्पासोबत सादर केलेले स्वतंत्र अहवाल पाहता सदर सेवा स्वयंपूर्ण नसून तूटीमध्ये चालविल्या जात आहेत. सबब सदर तिन्ही सेवा स्वयंपूर्ण करण्यासाठी नगरपरिषदेने उत्पन्नाचे स्त्रोत वाढवणे, कर व उपभोक्ता शुल्क आदींच्या दरात आवश्यक ती सुधारणा करून त्याची अंमलबजावणी सुरू करावी.

2) उपरोक्त कृती आराखडा तयार करताना नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविणेसाठी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी स्थायी निदेश क्र. 14 मधील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या उपाययोजनांचा अंतर्भाव करून नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रस्ताव नगरपरिषदेने सभेसमोर ठेवावेत. तसेच परिशिष्ट ब मधील काटकसरीच्या उपाययोजनाही राबवाव्यात आणि परिशिष्ट क मध्ये नमूद केंद्र शासन पुरस्कृत योजनाद्वारे नगरपरिषदेस निधी उपलब्ध करून घेऊन नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

3) नगरपरिषदेने पाणी पुरवठा व अन्य योजनांसाठी शासनाने हमी दिलेल्या कर्जाची व्याजासह मुदतीत परतफेड करण्यासाठी आवश्यक / पुरेशी तरतुद करून याप्रमाणे नियमीत परतफेड केली जाईल याची दक्षता मुख्याधिकारी यांनी घ्यावी. यासाठी अधिनियम व लेखासंहितेतील तरतुदी व अधिकारांचा पूर्ण वापर मुख्याधिकारी यांनी करावा.

4) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कल्याणासाठी अर्थसंकल्पात केलेली संपूर्ण तरतूद सन 2023-24 मध्ये खर्च होईल त्यादृष्टीने कामाचे नियोजन करून सदर कामे पूर्ण करावीत.

5) नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण योजनेसाठी राखीव ठेवण्यात येणारा महिला व बाल कल्याणासाठीच्या योजनांसाठी 5 टक्के निधी पूर्णपणे खर्च करणेची दक्षता घ्यावी.

6) नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात दिव्यांगासाठी राखीव ठेवण्यात आलेला निधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांगासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी 5 टक्के निधी पूर्णपणे खर्च करणेची दक्षता घ्यावी.

7) शासनाच्या विविध योजनेद्वारे उपलब्ध होणारा निधी (उदा. 15 वा वित्त आयोग, वैशिष्ठ्यपूर्ण योजना, रस्ता निधी, नागरी वस्ती सुधारणा, पाणी पुरवठा योजना इत्यादी) हा शासन निकषानुसार अनुज्ञेय कामांवर विहित कालमर्यादेत खर्च करण्यासाठी योग्य नियोजन व पाठपुरावा करून खर्चाची विनियोग प्रमाणपत्रे मुदतीपूर्वीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.तसेच या योजनांमध्ये ज्या योजनेत नगरपरिषद हिस्सा भरणे आवश्यक आहे, त्यासाठी तरतूदीनुसार स्वहिस्सा भरणे, त्रयस्थ लेखापरिक्षण करणे इ.साठी निधीची तरतूद करण्याची दक्षता घ्यावी.

8) कलम 101(6) नुसार मंजूर अर्थसंकल्पात परिस्थितीनुसार करणे इष्ट असेल त्याप्रमाणे नगरपालिकेकडून वेळोवेळी बदल किंवा फेरफार करता येतील मात्र असे फेरबदल अधिनियम व लेखासंहितेतील तरतूदींचे पालन करून कमीत कमी वेळा व कलम 101(6) च्या दोन्ही परंतु कामामध्ये नमूद मर्यादेचे पालन करून करण्यात यावेत.

9) कलम 101(7) नुसार अर्थसंकल्पात तरतूद नसताना कोणतीही रक्कम खर्च करू नये. अपवादात्मक परिस्थितीत काही खर्च करावा लागल्यास कलम 101(7) (ब) मधील तरतूदीनुसार आवश्यक पूर्तता करावी.

10) नगरपरिषद स्तरावर ठेवण्यात आलेल्या विविध राखीव निधी (उदा. वेतन राखीव निधी, एकत्रित पाणी पुरवठा व मलप्रवाह विल्हेवाट प्रकल्प निधी, कर्ज निवारण, घसारा, निवृत्तीवेतन, इत्यादी) मध्ये किमान आवश्यक रक्कम असल्याची खात्री करावी. अन्यथा चालू अर्थसंकल्पातून कमी पडणारी रक्कम वर्ग करावी.

11) नगर विकास विभागाचे परिपत्रक दि.09/03/1998 नूसार नगरपरिषदेच्या निव्वळ महसूली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम न.प. क्षेत्रातील क्रिडा क्षेत्रासाठी खर्च करण्याची तरतुद अंदाजपत्रकात करून सदर रक्कम खर्च केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

12) नगरपरिषद स्थावर ठेवण्यात आलेल्या वेतन राखीव निधी र. रु. 40,52,823/- कमी तरतूद केली आहे. तसेच निवृत्ती वेतन निधी र. रु. 32,69,364/- इतकी कमी तरतूद केलेली आहे. सदर दोन्ही घटकांमध्ये किमान आवश्यक रक्कमेची तरतूद करून घ्यावी. अन्यथा चालू अर्थसंकल्पातून कमी पडणारी रक्कम वर्ग करावी.

(जितेंद्र डूडी भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी सांगली**

**प्रति,** मा.नगराध्यक्ष / मुख्याधिकारी,
विटा नगरपरिषद विटा जि.सांगली.

**प्रत -**
1. मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, 3 रा मजला, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-25 यांना माहितीसाठी सादर.
2. मा.आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सादर